# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८
## क्रीडा विभाग - नागरिकांची सनद
## (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२-अ)

| अ.क्र | विषय | स्वरुप |
|---|---|---|
| 1 | **विभागाचे नाव** | क्रीडा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका |
| 2 | **विषय** | म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणे |
| 3 | **आवश्यक कागदपत्रे** | 1)विहित नमून्यात अर्ज<br>2)आयडेन्टिटी कार्ड साईज 2 फोटो<br>3)पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी पुरावा म्हणुन आवश्यक कागदपत्रे, (उदा.आधारकार्ड, रेशनिंग कार्डची सत्यप्रत)<br>4)संबंधित शाळा/महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे शिफरसपत्र<br>5)गतवर्षी उत्तीर्ण झालेबाबत गुणपत्रक,<br>6)राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य/सहभागा-बाबत गतवर्षीचे खेळाचे प्रमाणपत्र - 2 प्रती |
| 4 | **अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | जाहिर प्रकटन प्रसिध्द झालेनंतर म.न.पा.च्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध |
| 5 | **अर्ज स्विकारण्याचे ठिकाण** | क्रीडा विभाग, स.नं.१६५/२, १५ प्रेमलोक,<br>१ला मजला, प्रेमलोकपार्क बस स्टॉपसमोर,<br>चिंचवड, पुणे ४११०३३ |
| 6 | **अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | अर्ज स्विकारण्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाचे 03 महिने |
| 7 | **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आवश्यक आहे ते कलम** | 1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 66 नुसार<br>2)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 72(अ),(ब),(क) नुसार |
| **8** | **शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, ठराव इ.** | 1)मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/3/ कावि/43/2003 दि.10/02/2003<br>2)मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/4/कावि/647/2010 दि.25/10/2010 |
| | | **अ)जाहिर प्रकटन प्रसिध्दी, आवश्यक कागदपत्रे, तपासणी, खेळ प्रमाणपत्राची संबंधित कार्यालया- कडून तपासणी करून त्याबाबतचा अहवाल घेणे, सक्षम समितीची मान्यता, आदेश देणे.** |
| | | |

| 9 | निर्णय घेणारे अधिकारी | स्तर | पदनाम | निर्णयासाठी लागणारा कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | पहिला स्तर | लिपिक/ उपलेखापाल | 30 दिवस |
| | | दुसरा स्तर | उप आयुक्त, क्रीडा | 30 दिवस |
| | | तिसरा स्तर | अति. आयुक्त | 15 दिवस |
| | | आदेश प्रमाणपत्र निर्गमित करणेस सक्षम अधिकारी | आयुक्त | 15 दिवस |
| 10 | आवश्यक फी व त्यांचे परिपत्रक | --- | | |
| 11 | अंतिम निर्णय विहित कालावधीमध्ये न घेतला गेल्यास ज्याना जबाबदार धरायचे आहे त्यांचे नाव व पदनाम | त्या त्या स्तराप्रमाणे संबंधित जबाबदार राहतील. | | |
| 12 | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक | उप आयुक्त, क्रीडा विभाग<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>स.नं.१६५/२, १५ प्रेमलोक,<br>१ला मजला, प्रेमलोकपार्क बस स्टॉपसमोर,<br>चिंचवड, पुणे ४११०३३<br>फोन नं.020-27439115<br>E-Mail-sports@pcmcindia.gov.in | | |

उप आयुक्त (क्रीडा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

# म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना

मा. महापालिका सभा ठराव क्र.९९१ दि.२०/०९/२०१० चे अधिन राहून, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंना प्रोस्ताहन मिळून म.न.पा. परिसरातील जास्तीत जास्त राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या क्रीडा शिष्यवृत्ती देणेत येते. **सन – २००३-०४ ते २००९-१० या आर्थिक वर्षात प्रती खेळाडूं अनुक्रमे र.रू.१,८००/- र.रू.३,०००/- व सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून प्रति खेळाडूं अनुक्रमे र.रू.३,०००/- व र.रू.५,०००/- व सन सन २०८-१९ पासून प्रति खेळाडूं अनुक्रमे र.रू.३,३००/- व र.रू.५,५००/- अदा करण्यात येते.**

**क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणे कामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.क्रीडा/३/कावि/४३/२००३, दि.१०/०२/२०१० नुसार निश्चित केलेल्या धोरणातील अटी व शर्ती पुढील प्रमाणे**

१) क्रीडा शिष्यवृत्ती ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवासी विद्यार्थी खेळाडूंसाठी देण्यात येईल. त्यासाठी पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे, (उदा.रेशनिंग कार्डची सत्यप्रत) सादर करणे आवश्यक आहे. विद्यार्थी खेळाडू हा महापालिका हद्दीतील रहिवासी असेल व शिक्षणासाठी हद्दीबाहेरील शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असल्यास तो क्रीडा शिष्यवृत्तीसाठी पात्र राहील.

२) महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे तर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.३,०००/- तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रू.३,०००/- व राष्ट्रीय शालेय स्पर्धा (नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.५,०००/- क्रीडा शिष्यवृत्ती देणेत येईल.

३) अ.क्र.२ मध्ये नमुद केल्या व्यतिरिक्त अन्य स्पर्धांमध्ये उदा.क्रीडा मंडळे, संस्था, निमशासकीय संस्था यांनी आयोजित केलेल्या स्पर्धांमधील प्रमाणपत्रे क्रीडा शिष्यवृत्तीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

४) क्रीडा शिष्यवृत्ती ही ज्या वर्षी प्राविण्य मिळविले आहे, त्या वर्षापुरतीच मर्यादित राहील. ती कायम स्वरूपाची देय राहणार नाही.

५) क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेकामी दिलेल्या मुदतीत विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे  आवश्यक आहे.

६) अपुर्ण माहिती भरलेल्या अर्ज तसेच संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे मार्फत न पाठविलेल्या अर्जाचा  विचार केला जाणार नाही.

७) फक्त गतवर्षीची क्रीडा शिष्यवृत्ती  चालू वर्षात अदा केली जाईल.

८) क्रीडा शिष्यवृत्ती नापास (अनुत्तीर्ण) विद्यार्थी खेळाडूंस देण्यात येणार नाही. सदर विद्यार्थी खेळाडू हा  गतवर्षी उत्तीर्ण झालेला असावा.

९) क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेकामी विद्यार्थी खेळाडूने महापालिका  क्षेत्रात रहिवासी असलेचा पुरावा गतवर्षीच्या खेळाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र व गतवर्षी उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र (मार्कलिस्ट)विहित  नमुन्यातील अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१०) अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार नाही.

११) क्रीडा शिष्यवृत्ती अदा केली असल्यास ती वसुल केली जाईल.

१२) क्रीडा शिष्यवृत्तीचा वापर क्रीडा विकासासाठी करणे आवश्यक आहे.

१३) क्रीडा शिष्यवृत्ती मिळणेबाबत विद्यार्थी खेळाडूंस हक्क सांगता येणार नाही.

१४) विद्यार्थी खेळाडू हा महापालिका हद्दीबाहेर राहत असल्यास क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येणार नाही.

१५) विद्यार्थी खेळाडू हा गतवर्षी उत्तीर्ण झालेला असावा. तसेच तो चालू वर्षात शिक्षण घेत असावा.

१६) क्रीडा शिष्यवृत्ती अर्ज हे विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येतील.

१७) क्रीडा शिष्यवृत्ती अर्जाचे वाटप व स्विकृती दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट (सार्वजिक सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत करण्यात येईल. तथापी यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

१८) विविध खेळात प्राविण्य मिळविले तरी क्रीडा शिष्यवृत्ती एकदाच देय राहील.

१९) क्रीडा शिष्यवृत्ती मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

२०) क्रीडा शिष्यवृत्तीच्या धोरण, नियम व अटीमध्ये बदल करण्याचा अथवा वाढ किंवा घट करण्याचा अथवा शिथिल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहील.

मा.आयुक्तसो. यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/४९०/२०१८ दि.२०/८/२०१८ अन्वये महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचे तर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.३,३००/- तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंस वार्षिक र.रू.३,३००/- व राष्ट्रीय शालेय स्पर्धा (नॅशनल स्कूल गेम/स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूस वार्षिक र.रू.५,५००/- क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणेस मान्यता देणेत आलेली आहे.